## महाराष्ट्र विधानपरिषद

### पत्रक भाग दोन

शुक्रवार, दिनांक ७ मार्च, २०२५/ फाल्गुन १६, १९४६ (शके)

२४ . **सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेसचे वितरण**

विधानपरिषदेच्या सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०२५-२०२६ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसची टोकन्स **मा.सदस्यांना सोमवार, दिनांक १० मार्च, २०२५ रोजी हजेरीपटावर स्वाक्षरी करतांना व त्यानंतर मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५ रोजीपासून अधिवेशन संस्थगित होईपर्यंत "ड-३" (अंदाज समिती) कक्ष, बारावा मजला, कक्ष क्र.१२०२, विधान भवन, मुंबई** येथे देण्यात येतील. सन्मा.सदस्यांनी सदर टोकन्स खालील वितरणाच्या ठिकाणी जमा केल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेस त्यांना वितरीत करण्यात येतील.

| अ.क्र. (१) | वार व दिनांक (२) | अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेले पेनड्राईव्ह सुटकेससह वितरणाचा कालावधी (३) | वितरणाचे ठिकाण (४) |
|---|---|---|---|
| १. | सोमवार, दिनांक १० मार्च, २०२५ | अर्थसंकल्पावरील मा.उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे भाषण संपल्यानंतर | विधान भवन करीता आरक्षित असणाऱ्या वाहनतळाच्या मोकळ्या जागेवर उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये, विधान भवन, मुंबई. |
| २. | मंगळवार, दिनांक ११ मार्च, २०२५ पासून अधिवेशन संस्थगित होईपर्यंत | सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत | दालन क्रमांक १७०१ (क), सतरावा मजला, विधान भवन, मुंबई. |

सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यात येते की, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेस त्यांनी कृपया लवकरात लवकर प्राप्त करुन घ्याव्यात.

मा.मंत्री यांच्या खाजगी सचिवांनी उपरोक्त टोकन्स तसेच अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे पेनड्राईव्ह असलेल्या सुटकेसेस नेण्याची व्यवस्था करावी.

---

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ७ मार्च, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) कार्यभार,
महाराष्ट्र विधानपरिषद

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य ( मंत्री महोदयांसह )

२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.